# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**महोदय/महोदया,**

अन्न व सुरक्षा मानदे अधिनियम २००६ ची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबतचे सिध्दार्थ खरात, सह सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-१११११/प्र.क्र.२०/१८ दि. ०४/०५/२०१८ रोजीचे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. त्यानुसार कार्यवाही करावी.

कळावे,

सोबत- वरीलप्रमाणे

आदेशान्वये
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

संदर्भ क्र. संलग्नता टी-२/ 126
दिनांक- 24 SEP 2018

अन्न सुरक्षा मानदे अधिनियम २००६ ची
प्रभावी अंमलबजावणी होणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण - १११९/(प्र.क्र.२०/१८)/समन्वय
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ०४ मे, २०१८.

**शासन परिपत्रक -**

अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य हे अन्न सुरक्षा मानदे कायद्याची अंमलबजावणी करते व सदर कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने राज्यपातळीवर मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आलेली आहे. अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम अंतर्गत राज्यस्तरिय समितीची बैठक दि.११.९.२०१७ रोजी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सदर बैठकीचे इतिवृत्तानुसार महाविद्यालयातील आवारातील उपहारगृहे यांना अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ अंतर्गत कलम ३१ नुसार परवाने/नोंदणी घेणे आवश्यक आहे.

२. अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६, नियम व नियमन २०११ चे कलम ३१ (१) व (२) नुसार प्रत्येक अन्न व्यावसायिकांने अन्न पदार्थ उत्पादन, साठवण, वितरण, वाहतूक व विक्री यासाठी अन्न परवाना तथा नोंदणी करणे बंधनकारक आहे. त्यानुसार प्रत्येक अन्न व्यावसायिकांने अन्न सुरक्षा व मानदे कायद्यांतर्गत परवाना नोंदणी घेणे आवश्यक आहे. आपल्या अधिपत्याखाली येणा-या महाविद्यालये/विद्यापीठ/शैक्षणीक संस्था यांच्या आवारातील उपहारगृहे यांनी अद्यापपर्यन्त परवाना अथवा नोंदणी घेतलेली नसेल त्यांना परवाना व नोंदणी घेण्यासाठी बंधनकारक करावे व त्याबाबतचा अनुपाल अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

३. परवाना व नोंदणी (foodlicensing.fssai.gov.in) या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने करावयाची आहे. ज्या अन्न व्यावसायिकांची वार्षिक उलाढाल रु.१२ लाखापेक्षा कमी आहे त्यांनी नोंदणीसाठी ऑनलाईन फॉर्म बी भरावा. (वार्षिक शुल्क रु.१००/-) व वार्षिक उलाढाल रु.१२ लाखापेक्षा जास्त आहे त्यांनी परवान्यासाठी ऑनलाईन फॉर्म बी भरावा. (वार्षिक शुल्क रु.२०००/- उत्पादकास रु.३०००/-) याबाबत काही अडचण आल्यास अन्न व औषध प्रशासनाच्या संबंधित जिल्हा कार्यालयास (सहाय्यक आयुक्त, अन्न) संपर्क साधावा. अथवा टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ वर संपर्क साधावा.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आवक विभाग
डी. डी./आय. पी. ओ.
18 JUN 2018
विभाग:-
सही:-
क्रमांक:- 1297

४.	सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०५०५१३३२१३८३०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( सिद्धार्थ खरात )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.विरोधीपक्ष नेता (विधानसभा/विधानपरिषद) विधान भवन, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, (उच्च व तंत्र शिक्षण विभाग ) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
८. आयुक्त, अन्न आणि औषध प्रशासन ( म. रा. ),सव्हे नं.३४१, बांद्र-कुर्ला संकुल, मुंबई.
९. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
१४. निवडनस्ती.